# NUTA BULLETIN

OFFICIAL JOURNAL OF NAGPUR UNIVERSITY TEACHERS' ASSOCIATION

Regd. No. MAHBIL/2001/4448 : Postal Registration No. AMT/RNP/78/2024-2026

YEAR : 49) 15th May 2024 ( No. of Pages 08 ) ( No : 06


*सन २००६ पूर्वी सेवानिवृत्त झालेल्या प्राध्यापकांचे सेवानिवृत्ती वेतन ठरवितांना भेदभावपूर्ण वागणूक : ९*

## मा.उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठाचा व नागपूर खंडपीठाचा यात्रकरणी न्यायनिर्णय अधिघोषित


- **डॉ. प्रवीण रघुवंशी,** अध्यक्ष, 'नुटा'


**१.** "सन २००६ पूर्वी सेवानिवृत्त झालेल्या प्राध्यापकांचे सेवानिवृत्ती वेतन ठरवितांना भेदभावपूर्ण वागणूक : सुनावणी पूर्ण झाली, 'Closed for Judgement' चे आदेश झाले, वर्षभर जज्जमेंट आले नाही, खंडपीठ विखंडित झाले, विखंडित झालेले खंडपीठ पुन्हा मंडित होण्याची शक्यता नाही, अशा स्थितीत काय करावे ?" या मथळ्याचे १५ परिच्छेदांचे एक तपशीलवार टिपण सन २०२३ च्या नुटा बुलेटीनच्या पृष्ठ १३४ वर मी प्रसृत केलेले होते. त्यानंतरच्या घटनाक्रमाची माहिती पुढील प्रमाणे नमूद करण्यात येत आहे.

**२.** तत्सम विषयावर मुंबई उच्च न्यायालयाच्या मा.औरंगाबाद खंडपीठासमोर सन २०१६ च्या याचिका क्रमांक ५०४२ मध्ये याबाबतीत दिनांक २ फेब्रुवारी २०२४ रोजी खंडपीठाने निर्णय घोषित केला. या निर्णयान्वये याचिकाकर्त्यांची विनंती मान्य करण्यात आली. औरंगाबाद खंडपीठाच्या या निर्णयाच्या परिच्छेद १७ मध्ये पुढीलप्रमाणे नमूद करण्यात आलेले आहे. :-

**"17. In substance what transpires is that the Pension Rules and particularly rule 110 has been consistently maintaining that the pension is to be fixed @ 50% of the basic pay and at no point it read 40% of basic of the revised pay.** The impugned government resolution dated 05-05-2009 requires this to happen. **The government resolution cannot, therefore, be not only violative of Article 14 since it discriminates between employees who retired between 01-01-1996 and 01-01-2006 as against ones who retired prior to 01-01-1996 and who would retire after 01.01.2006, it would also be illegal being contrary to rule 110(2)."**

**३.** शेवटी मा.उच्च न्यायालयाने परिच्छेद २५ मध्ये पुढीलप्रमाणे आदेश पारित केले :-

**"25. The writ petitions are partly allowed and the rule is made absolute in the above terms.** The respondent shall take appropriate steps in the light of the above observations and conclusions and shall **revise the pension of the members of the petitioners and all similarly situate persons as early as possible and in any case within four (4) months and shall pay the arrears within four (4) months thereafter."**

**४.** औरंगाबाद खंडपीठाने दिलेला हा निर्णय संघटनेच्या वतीने संघटनेचे अधिवक्ता श्री.फिरदोस मिर्झा यांच्या लक्षात आणून देण्यात आला. संघटनेच्या अधिवक्त्यांनी तावडतोब ही बाब मा.न्यायालयाच्या लक्षात आणून देण्याची कारवाई पूर्ण केली. नुटाने दाखल केलेली याचिका (Writ Petition No. 3052 of 2016) दिनांक २१ मार्च २०२४ रोजी मा.न्यायमूर्ती श्री.नितिन सांबरे व मा.न्यायमूर्ती श्री.अभय मंत्री यांच्या खंडपीठापुढे दिनांक २१ मार्च २०२४ रोजी सुनावणीला आली. संघटनेच्या अधिवक्त्यांनी कोणती बाब मा.खंडपीठाच्या लक्षात आणून दिली हे त्या दिवशीच्या खंडपीठाच्या आदेशाच्या परिच्छेद ३ मध्ये पुढील शब्दात नमूद आहे. :-

"3. It is the contention of Shri F. T. Mirza, learned counsel for the petitioners that the issue is covered by judgment dated 02/02/2024 in Writ Petition No.5042/2016 .... delivered at Aurangabad Bench."

**५.** त्याच दिवशी मा.खंडपीठाने शासकीय अधिवक्त्यांनी औरंगाबाद खंडपीठाच्या निकालाचे अध्ययन करावे व पुढच्या तारखेला खंडपीठाला त्याबाबतीत अवगत करावे असे आदेश पारित केले ते पुढील शब्दात :-

"4. Ms Tajwar Khan, the learned Assistant Government Pleader is granted time to go through the aforesaid judgment and address the Court in the matter."

**६.** त्यानंतर पुन्हा ही याचिका दिनांक १ एप्रिल २०२४ रोजी त्याच खंडपीठापुढे पुन्हा सुनावणीला आली. औरंगाबाद खंडपीठामध्ये ज्या विषयावर दिनांक २ फेब्रुवारी २०२४ रोजी निर्णय झालेला आहे त्या याचिकेतील व नागपूर खंडपीठासमोरील याचिकेतील विषय एक सारखा आहे याबाबतीत कोणतेही दुमत नाही असे त्या दिवशीच्या आदेशात मा.खंडपीठाने नमूद केले.

### Nagpur University Teachers' Association

**MEETING NOTICE : 1**

**DATED : 15.05.2024**

**From :**
**Dr.Nitin C. Kongre**
Secretary, NUTA
Plot No. 144, Gayatri Nagar,
Behind IT Park, Nagpur-440022
**To,**
All the members
of the Nagpur University Teachers' Association
Dear members,

I have the honour to inform you that the General Body meeting of the Nagpur University Teachers' Association will be held at 12.00 noon, on the Day and the Date mentioned below.

2. If you propose to move any resolution for the consideration of the General Body, you are requested to send such resolution to me, with a copy to Prof. P.B. Raghuwanshi, President NUTA, Buty Plot, Near Mahajan wadi, Rajapeth, Amravati 444 601 within a period of 10 days from the date of the posting of this Bulletin.

3. It will not be possible to include in the agenda, resolutions received after the due date. So please make it convenient to send such resolutions, if any, within the stipulated time. The place of the meeting will be intimated to you alongwith the agenda.

Thanking you.

Yours faithfully
**Sd/- Dr.Nitin C. Kongre,**
Secretary, NUTA.

***Time, Day and Date of the Meeting 12.00 Noon on Sunday, the 30th June 2024***

ते पुढील शब्दातः-

"It is not in dispute that the issue is squarely covered by the judgment delivered by the Aurangabad Bench in Writ Petition No.5042/2016 (Association of College and University Superannuated Teachers v. Union of India and others) decided on 02-2-2024."

७. मात्र या सुनावणीच्या दिवशी शासकीय वकिलांनी मा.खंडपीठाला असे सांगितले की, शासनाने मा.सर्वोच्च न्यायालयात विशेष अनुमती याचिका दाखल करण्याचा निर्णय घेतलेला आहे तेव्हा निदान दोन आठवड्याचा वेळ देण्यात यावा. याला संघटनेच्या अधिवक्त्यांनी विरोध केला. याबाबतचा आदेशातील भाग पुढीलप्रमाणे :-

"2. However, the learned Assistant Government Pleader Ms. Tajwar Khan would urge that the State has already decided to approach before the Hon'ble Apex Court. So she has sought two weeks time. The learned Counsel for the petitioners have strenuously opposed the prayer for adjournment as the issue is covered by the above judgment and the petitioners are old aged persons."

मा.खंडपीठाने त्यादिवशी पुढची सुनावणी ही दिनांक २२ एप्रिल २०२४ रोजी होईल असे आदेश त्याच दिवशी पारित केले व आदेशपत्रात असेही नमूद केले की, "4. Needless to clarify that on the next date of hearing this Court will be disposing of the writ petitions in terms of the aforesaid order."

८. मा.खंडपीठाने आदेशित केल्याप्रमाणे पुढची सुनावणी दिनांक २२ एप्रिल २०२४ रोजी झाली. त्या दिवशीच्या सुनावणीमध्ये शासकीय अधिवक्त्यांनी मा.सर्वोच्च न्यायालयात विशेष अनुमती याचिका दाखल करण्यासाठी वित्त विभागाने यापूर्वीच मान्यता दिलेली आहे. असे मा.खंडपीठासमोर नमूद केले.. आदेशपत्रातील याबाबतचा भाग शब्दशः पुढीलप्रमाणे :-

"2. Learned AGP Ms. T.H. Khan has tried to prevail for an adjournment as it is claimed that the Finance Department has already approved the proposal to file Special Leave Petition against the judgment and order dated 2.2.2024 in Writ Petition No. 5042/2016 at Aurangabad Bench."

९. सर्व बाजूंचे म्हणणे ऐकून घेतल्यानंतर मा.नागपूर खंडपीठाने पुढीलप्रमाणे आदेश पारित केले. :-

"3. The fact remains that the issue raised in the present

**IN THE HIGH COURT OF JUDICATURE AT BOMBAY, NAGPUR BENCH, AT NAGPUR.**

## WRIT PETITION NO. 3052 OF 2016

Nagpur University Teachers Association, Nagpur and others
..versus..
The Union of India and others

**WITH WRIT PETITION NO. 2284 OF 2019** (Shri Laxmikant Pandurang Gawande..vs.. The State of Maharashtra and another) **WITH WRIT PETITION NO. 2021 OF 2012** (Shri Narayan Wamanrao Chawande and others..vs..The Govt. of Maharashtra and others) **WITH WRIT PETITION NO. 4062 OF 2012** (Ramesh Madhav Acharaya and others ..vs.. The State of Maharashtra and others) **WITH WRIT PETITION NO. 3991 OF 2013** (Shri Shankarlal K. Kothari and others ..vs.. The State of Maharashtra and others) **WITH WRIT PETITION NO. 3986 OF 2013** (Vishwanath Trimbak Hajare and others ..vs.. The State of Maharashtra and others) **WITH WRIT PETITION NO. 5644 OF 2018** (Shri Ramesh L. Vaidya and others..vs.. The State of Maharashtra and another) **WITH WRIT PETITION NO. 5283 OF 2011** (Dr. Nilkanth s/o M. Nimdeokar and others ..vs.. The State of Maharashtra and another)

**WP 3052/2016:** Mr. F.T. Mirza with Mr. A.I. Sheikh, Counsel for the petitioners, Ms. Mugdha Chandurkar, counsel for respondent No. 1. Ms. T.H. Khan, AGP for respondents 2 to 5, **WP 2284/2019:** Mr. A.I. Sheikh, Counsel for the petitioner, Ms. T.H. Khan, AGP for respondents 1 and 2. **WP 2021/2012:** Mr. M.M. Agnihotri, Counsel for the petitioners, Mr. T.H. Khan, AGP for respondents 1 to 3, **WP 4062/2012:** Mr. M.M. Agnihotri, Counsel for the petitioners, Ms. T.H. Khan, AGP for respondents 1 to 3. **WP 3991, 3986/2013:** Mr. J.B. Gandhi, Counsel for the petitioners, Ms. T.H. Khan, AGP for respondents 1 to 3. **WP 5644/2018:** Mr. A.I. Sheikh, Counsel for the petitioners, Ms. T.H. Khan, AGP for respondents 1 to 3. **WP 5283/2011:** Mr. M.M. Agnihotri, Counsel for the petitioners, MS. T.H. Khan, AGP for respondents 1 to 3, Mr. S.K. Mishra, Counsel for respondent 4. Mr. R.L. Khapre, Senior Counsel assisted by Mr. A.S. Shukla, Counsel for respondents in W.P. Nos.3052/2016, 2284/2019, 2021/2012, 4062/2012, 3991/2013, 3986/2013, 5644/2018 and 5283/2011.

**CORAM : NITIN W. SAMBRE & ABHAY J. MANTRI , J J .**

**DATED : 22-04-2024**

We have heard learned counsel for the respective parties.

**2. Learned AGP Ms. T.H. Khan has tried to prevail for an adjournment as it is claimed** that the Finance Department has already approved the proposal to file Special Leave Petition against the judgment and order dated 2.2.2024 in Writ Petition No. 5042/2016 at Aurangabad Bench in the Matter of Association of College and University Superannuated Teachers, (Maharashtra) Vs. Union of India and Others.

3. The fact remains that the issue raised in the present petition is not disputed to be covered by the aforesaid judgment dated 2.2.2024.

**4. As such, it cannot be said that present petition can be kept pending as has been prayed by learned AGP just because respondent/State has taken a decision to approach the Hon'ble Supreme Court questioning the aforesaid decision.**

**5. In view of the fact that the issue raised in the present petition is squarely covered by the aforesaid judgment in Writ Petition No. 5042/2016 at Auranbabad Bench, we deem it appropriate to allow the petition in terms of the very same order.**

6. The petition stands allowed in terms of aforesaid observations.

7. Civil Application/s, if any, stands disposed of.

**(NITIN W. SAMBRE, J.)** **(ABHAY J. MANTRI, J.)**

petition is not disputed to be covered by the aforesaid judgment dated 2.2.2024.

**4. As such, it cannot be said that present petition can be kept pending as has been prayed by learned AGP just because respondent/State has taken a decision to approach the Hon'ble Supreme Court questioning the aforesaid decision.**

**5. In view of the fact that the issue raised in the present petition is squarely covered by the aforesaid judgment in Writ Petition No. 5042/2016 at Auranbabad Bench, we deem it appropriate to allow the petition in terms of the very same order.**

6. The petition stands allowed in terms of aforesaid observations."

**१०.** एकएका शिक्षकाला न्यायालयात पाठवून सतावणे, शिक्षकांच्या बाजूने निर्णय झाला तरी आम्ही सर्वोच्च न्यायालयात SLP करणार आहोत असे सांगून एकएका शिक्षकाला सतावण्याचे कार्य सुरूच ठेवणे, SLP मा.सर्वोच्च न्यायालयात फेटाळली गेली तरी त्या एकट्या शिक्षकाच्या बाबतीत आदेश काढणे व इतर तत्सम शिक्षकांना सतावण्याचा कार्यक्रम सुरूच ठेवणे, मा.न्यायालयाचा निर्णय धोरणात्मक असला तरी अंमलबजावणी एकट्या शिक्षकापुरतीच करणे, हा उच्च शिक्षण विभागाचा उपक्रम यापूर्वी अनेक प्रकरणात सिद्ध झालेला आहे. हे माझे एकट्याचे निरिक्षण नाही तर असाच अनुभव मा.उच्च न्यायालयाने नोंदबद्ध केलेला आहे. सन २०२२ च्या याचिका क्रमांक ५३५७ मध्ये दिनांक २९ मार्च २०२३ रोजी मा.उच्च न्यायालयाच्या निर्णयात ही बाब नोंदबद्ध झालेली आहे. त्यातील परिच्छेद १७ पुढीलप्रमाणे:-

**"17. Finally, we are constrained to note our great dismay, even displeasure, at the manner in which the State Government persists in raking up the same defence again and again. We do not know how many times this Court has to pronounce the law.** The aforesaid extracts show that **this Court had laid down the law, and the pronouncement was not limited to the facts of any particular case. Yet, the government persists in the belief that the law declared by this court is somehow not binding on it, or that every judgment, no matter what the wording and even if it clearly lays down the law is confined to that particular petition. We are letting it pass this once, but if this is repeated we may well be moved to far sterner action."**

उच्च शिक्षण विभागातील अधिकाऱ्यांच्या या कोडगेपणाला कायदेशीररित्या उत्तर देण्यासाठी काय उपाययोजना कराव्यात याबाबत विचार विनिमय करण्यासाठी या शिक्षकांची बैठक घेण्याचा निर्णय घेण्यात आलेला आहे. बैठकीची सूचना स्वतंत्रपणे प्रसृत करण्यात आलेली आहे.

**- डॉ. प्रवीण रघुवंशी**, अध्यक्ष, 'नुटा'

*PR : (1) 101/2015 (2) 126/2015 (3) 138/2015 (4) 152/2015 (5) 21/2017 (6) 107/2017 (7) 126/2017 (8) 192/2017 (9) 89 /2024 (10) 91 /2024*

## IN THE HIGH COURT OF JUDICATURE AT BOMBAY NAGPUR BENCH, NAGPUR.

## WRIT PETITION NO. 3052 OF 2016

Nagpur University Teachers Association, Nagpur, Thr. Secretary Anil W. Dhage & Ors. .. Petitioners V/s. The Union of India, Thr. Secretary, Dept. of Higher Education, New Delhi .. Respondent **WITH WRIT PETITION NO. 2284 OF 2019** Laxmikant P. Gawande .. Petitioner Vs. State of Maharashtra & Anr. .. Respondents **WITH WRIT PETITION NO. 2508 OF 2017** Sitaram Kashiram Shivankar & Ors. .. Petitioners Vs. State of Maharashtra & Ors. .. Respondents **WITH WRIT PETITION NO. 3062 OF 2016** Dr. Sahebrao S/o Laxmanrao Jadhao & Ors. .. Petitioners Vs. State of Maharashtra & Ors. .. Respondents **WITH WRIT PETITION NO. 3176 OF 2016** Mahadeo S/o Dhondabaji Chaudhari & Ors. .. Petitioners Vs. State of Maharashtra & Ors. ..Respondents **WITH WRIT PETITION NO. 4062 OF 2012** Ramesh Madhav Acharaya & Ors. .. Petitioners Vs. State of Maharashtra & Ors. .. Respondents **WITH WRIT PETITION NO. 4628 OF 2016** Gajanan Mansaram Borkar & Ors. .. Petitioners Vs. State of Maharashtra .. Respondents **WITH WRIT PETITION NO. 3991 OF 2013** Shankarlal K. Kothari & Ors. .. Petitioners Vs. The Govt. of Maharashtra & Ors. .. Respondents **WITH WRIT PETITION NO. 4359 OF 2016** Dr. Madhusudan R. Joshi & Ors. .. Petitioners Vs. The State of Maharashtra & Anr. .. Respondents **WITH WRIT PETITION NO. 5644 OF 2018** Ramesh Laxmanrao Vaidya & Ors. .. Petitioners Vs. The State of Maharashtra & Ors. .. Respondents **WITH WRIT PETITION NO. 5283 OF 2011** Dr. Nilkanth S/o Markand Nimdeokar & Ors. .. Petitioners Vs. The Govt. of Maharashtra & Ors. .. Respondents **WITH WRIT PETITION NO. 750 OF 2016** Dr. Vitthal S/o Ramdaspant Bhamburkar .. Petitioner Vs. The State of Maharashtra & Ors. .. Respondents **WITH WRIT PETITION NO. 6599 OF 2016** The State of Maharashtra & Ors. .. Petitioners Vs. Dr. Arun S/o Balwantrao Tongo & Ors. .. Respondents

Mr F. T. Mirza, Advocate for petitioners in WP 3052/2016. Mr A. I. Sheikh, Advocate for petitioners in WP/2284/2019, 5644/2018. Shri B. G. Kulkarni, Advocate for petitioners in WP/2508/2017, 3062/2016, 3176/2016, 4628/2016, 4359/2016. Mr Parth Lalit Sagdeo Advocate for petitioners in WP 4062/2012, 5283/2011. Shri J. B. Gandhi, Advocate for petitioner in WP/4628/2016. Shri V. G. Bhamburkar, Advocate for petitioner in WP/750/2016. Shri Arun R. Patil for respondent/s in WP 2508/2017, 3062/2016, 3176/2016, 4359/2016. Mr A. Z. Jibhkate for respondent/s in WP 750/2016. Mr R. L. Khapre Senior Advocate with Shri D. R. Khapre, Advocate for respondent/s in WP/3052/2016, 2284/2019, 2021/2012, 4062/2012 3991/2013, 3986/2013,5644/2018, 5283/2011. Ms Mugdha Chandurkar, Advocate for respondent in WP/4628/2016. Shri A. Z. Jibhkate, Advocate for respondents in WP/750/2016. Ms Tajwar Khan, Assistant Government Pleader for State.

### CORAM : NITIN W. SAMBRE AND ABHAY J. MANTRI, JJ.

### DATE : March 21, 2024

**Civil Application Nos.2365/2022, 2367/2022, 2366/2022 in Writ Petition No.4062/2012**

1. For the reasons mentioned, the applications are allowed. Delay in bringing the legal heirs of petitioner No.2 on record is condoned. Legal heirs of petitioner No.2 are permitted to be brought on record. Amendment be carried out forthwith.

2. Civil Applications are allowed and disposed of.

**Writ Petition No.3052/2016**

**3. It is the contention of Shri F. T. Mirza, learned counsel for the petitioners that the issue is covered** by judgment dated 02/02/2024 in Writ Petition No.5042/2016 (Association of College and University Superannuated Teachers, (Maharashtra) vs. Union of India, Thr. its Under Secretary, Dept. of Education, New Delhi and ors.) delivered at Aurangabad Bench.

**4. Ms Tajwar Khan, the learned Assistant** Government Pleader is granted time to go through **the aforesaid judgment and address the Court in the matter.**

5. Stand over to 01/04/2024.

**(NITIN W. SAMBRE, J.)** **(ABHAY J. MANTRI, J.)**

## NAGPUR UNIVERSITY TEACHERS' ASSOCIATION

# १ जानेवारी, २००६ पूर्वी सेवानिवृत्त झालेल्या अधिव्याख्यात्यांची सभा

## सभेची सूचना

**"मा.उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठाचा व नागपूर खंडपीठाचा याप्रकरणी न्यायनिर्णय अधिघोषित"** या मथळ्याचे संघटनेच्या अध्यक्षांनी तयार केलेले १० परिच्छेदांचे एक तपशीलवार टिपण याच अंकात प्रसृत करण्यात आलेले आहे. त्यातील परिच्छेद १० मधील मुद्यांचा विचार करण्यासाठी १ जानेवारी, २००६ पूर्वी सेवानिवृत्त झालेल्या अशा सर्व प्राध्यापकांची एक बैठक घेण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. नागपूर व अमरावती विभागातील तीनही विद्यापीठांच्या क्षेत्रातील अशा प्राध्यापकांच्या बैठकीचे आयोजन करण्यात आलेले असून बैठकीचा दिवस, दिनांक वेळ व स्थळ खालील तक्त्यात दिल्याप्रमाणे आहे.

| तक्ता |
|---|
| **सभेचे ठिकाण :** शिक्षक भवन, अमरावती विद्यापीठ परिसर, अमरावती |
| **सभेचा दिवस व दिनांक :** रविवार, दिनांक ०२.०६.२०२४ |
| **सभेची वेळ :** दुपारी ३.०० वाजता |

सर्व संबंधित प्राध्यापकांनी उपस्थित रहावे अशी विनंती आहे.- **डॉ. नितिन कोंगरे, सचिव, नुटा**

## IN THE HIGH COURT OF JUDICATURE AT BOMBAY, NAGPUR BENCH, AT NAGPUR.

## WRIT PETITION NO. 3052 OF 2016

(Nagpur University Teachers Association, Nagpur and others ..vs.. The Union of India and others) **WITH WRIT PETITION NO. 2284 OF 2019** (Shri Laxmikant Pandurang Gawande..vs.. The State of Maharashtra and another) **WITH WRIT PETITION NO. 2021 OF 2012** (Shri Narayan Wamanrao Chawande and others..vs..The Govt. of Maharashtra and others ) **WITH WRIT PETITION NO. 2508 OF 2017** (Sitaram Kashiram Shivankar and others..vs.. The State of Maharashtra and others) **WITH WRIT PETITION NO. 3062 OF 2016** (Dr. Sahebrao s/o Laxmanrao Jadhao and others ..vs.. The State of Maharashtra and others) **WITH WRIT PETITION NO. 3176 OF 2016** (Mahadeo s/o Dhondabaji Chaudhari and others ..vs.. The State of Maharashtra and others) **WITH WRIT PETITION NO. 4062 OF 2012** (Ramesh Madhav Acharaya and others ..vs.. The State of Maharashtra and others) **WITH WRIT PETITION NO. 4628 OF 2016** (Gajanan Mansaram Borkar and others ..vs.. The State of Maharashtra and others) **WITH WRIT PETITION NO. 3991 OF 2013** (Shri Shankarlal K. Kothari and others ..vs.. The State of Maharashtra and others) **WITH WRIT PETITION NO. 3986 OF 2013** (Vishwanath Trimbak Hajare and others ..vs.. The State of Maharashtra and others) **WITH WRIT PETITION NO. 4359 OF 2016** (Dr. Madhusudan R. Joshi and others ..vs.. The State of Maharashtra and another) **WITH WRIT PETITION NO. 5644 OF 2018** (Shri Ramesh L. Vaidya and others..vs.. The State of Maharashtra and another) **WITH WRIT PETITION NO. 5283 OF 2011** (Dr. Nilkanth s/o M. Nimdeokar and others ..vs.. The State of Maharashtra and another) **WITH WRIT PETITION NO. 750 OF 2016** (Dr. Vitthal s/o R. Bhamburkar ..vs.. The State of Maharashtra and others) **WITH WRIT PETITION NO. 6599 OF 2016** (The State of Maharashtra ..vs.. Dr. Arun s/o Balwantrao Tongo and others)

**WP 3052/2016:** Mr. A.I. Sheikh, Counsel for the petitioners, Ms. T.H. Khan, AGP for respondents 2 to 5, Mr. Arun Agrawal, Counsel for respondent 6. **WP 2284/2019:** Mr. A.I. Sheikh, Counsel for the petitioner, Ms. T.H. Khan, AGP for respondents 1 and 2. **WP 2021/2012:** Mr. M.M. Agnihotri, Counsel for the petitioners, Mr. T.H. Khan, AGP for respondents 1 to 3, **WP 2508/2017:** Mr. B.G. Kulkarni, Counsel for the petitioners, Ms. T.H. Khan, AGP for respondents 1 and 2, Mr. Arun Agrawal, Counsel for respondent 4, Mr. U.M. Aurangabadkar, Counsel for respondent 5, Mr. A.R. Patil, Counsel for respondent 6. **WP 3262/2016:** Mr. B.G. Kulkarni, Counsel for the petitioners, Ms. T.H. Khan, AGP for respondents 1 and 2, Mr. Arun Agrawal, Counsel for respondent 4, Mr. S.A. Chaudhari, Counsel for respondent 5, Mr. A.R. Patil, Counsel for respondent 6. **WP 3176/2016:** Mr. B.G. Kulkarni, Counsel for the petitioners, Mr. T.H. Khan, AGP for respondents 1 to 3, Mr. A.S. Agrawal, Counsel for respondent 4, Mr. A.M. Joshi, Counsel for respondent 5, Mr. Arun Agrawal, Counsel for respondent 6. **WP 4062/2012:** Mr. M.M. Agnihotri, Counsel for the petitioners, Ms. T.H. Khan, AGP for respondents 1 to 3. **WP 4628/2016:** Mr. B.G. Kulkarni, Counsel for the petitioners, Ms. T.H. Khan, AGP for respondents 1 & 2, Mr. A.S. Agrawal, Counsel for respondent 5, Mr. U.N. Vyas, Counsel for respondent 6. **WP 3991, 3986/2013:** Mr. J.B. Gandhi, Counsel for the petitioners, Ms. T.H. Khan, AGP for respondents 1 to 3. **WP 4359/2016:** Mr. B.G. Kulkarni, Counsel for the petitioners, Ms. T.H. Khan, AGP for respondents 1 & 2, Mr. A.R. Agrawal, Counsel for respondent 4, Mr. U.N. Vyas, Counsel for respondent 6, Mr. A.R. Patil, Counsel for respondent 7. **WP 5644/2018:** Mr. A.I. Sheikh, Counsel for the petitioners, Ms. T.H. Khan, AGP for respondents 1 to 3. **WP 5283/2011:** Mr. M.M. Agnihotri, Counsel for the petitioners, MS. T.H. Khan, AGP for respondents 1 to 3, Mr. S.K. Mishra, Counsel for respondent 4. **WP 750/2016:** Mr. V.G. Bhamburkar, Counsel for the petitioner, Ms. T.H. Khan, AGP for respondents 1 to 3, Mr. A.Z. Jibhkate, Counsel for respondents 4 and 5. **WP 6599/2016:** Ms. T.H. Khan, AGP for the petitioner, Mr. R.L. Khapre, Senior Counsel for petition No.3, Mrs. R.D. Raskar, Counsel for respondents 1 and 2. Mr. R.L. Khapre, Senior Counsel assisted by Mr. D.R. Khapre, Counsel for respondents in W.P. Nos.3052/2016, 2284/2019, 2021/2012, 4062/2012, 3991/2013, 3986/2013, 5644/2018 and 5283/2011.

## CORAM : NITIN W. SAMBRE & ABHAY J. MANTRI , J J .

## DATED : 01-04-2024

**It is not in dispute that the issue is squarely** covered by the judgment delivered by the Aurangabad Bench in Writ Petition No.5042/2016 (Association of College and University Superannuated Teachers v. Union of India and others) decided on 02-2-2024.

2. However, the learned Assistant Government Pleader **Ms. Tajwar Khan would urge that the State** has already decided to approach before the Hon'ble Apex Court. So she has sought two weeks time. The learned Counsel for the petitioners have strenuously opposed the prayer for adjournment as the issue is covered by the above judgment and the petitioners are old aged persons.

3. In view of above, stand over to 22-4-2023, as a last chance.

4. **Needless to clarify that on the next date of** hearing this Court will be disposing of the writ petitions in terms of the aforesaid order.

**Writ Petition No. 6599 of 2016**

The learned Counsel for respondent Nos.1 and 2 Mrs. R.D. Raskar informs that petition is abated against respondent Nos.1 and 3 for which till this date no steps are taken by the petitioners.

2. Since the State has already decided to approach before the Hon'ble Apex Court against the judgment delivered by the Aurangabad Bench in Writ Petition No.5042/2016, stand over to 22-4-2024.

**(NITIN W. SAMBRE, J.)** **(ABHAY J. MANTRI, J.)**

# *प्रत्यक्ष 'संविधानात-बदल' न करता मोडतोड करून बदलवून संविधानातील तरतुदींचा वापर करण्यात उच्च शिक्षण विभागाची विक्रमी वाटचाल*

**- प्रा.बी.टी.देशमुख**

*माजी विधान परिषद सदस्य व महाराष्ट्र प्राध्यापक महासंघाचे माजी अध्यक्ष*

*वृत्तपत्रीय प्रसारण : दिनांक १३ एप्रिल २०२४*

भारतीय संविधानामध्ये बदल करण्याच्या चर्चेने राष्ट्रीय स्तरावर चांगलाच वेग घेतलेला आहे. **पंतप्रधानांच्या आर्थिक सल्लागार समितीचे अध्यक्ष श्री.बिबेक देबरॉय** यांनी एका इंग्रजी दैनिकात एक तपशीलवार लेख लिहून भारतीय संविधानाबद्दल अत्यंत आक्षेपार्ह अशी विधाने केलीत. तेथून या चर्चेला सुरुवात झाली. केशवानंद भारती खटल्यामध्ये मा.सर्वोच्च न्यायालयाने ठरवून दिल्याप्रमाणे घटनेच्या मूळ संरचनेच्या (Basic Structure) विरोधात जाईल असा बदल करता येत नाही. श्री.बिबेक देबरॉय या लेखात असे मत मांडतात की, घटनेत दुरुस्ती केली आणि ती मूळ घटनात्मक संरचनेच्या विरोधात असेल तर सर्वोच्च न्यायालय ती घटनादुरुस्ती रद्दबातल करू शकते म्हणून आपण नवीन घटना तयार करणेच जास्त योग्य होईल. त्यांच्या लेखाचा मथळाच मुळात **"There is a case for 'we the people' to embrace a new Constitution"** असा आहे आणि या लेखात पुढे त्यांनी **"We the People have to give ourselves a new Constitution"** असे प्रतिपादन केलेले आहे.

**२.** एका बाजूला श्री.बिबेक देबरॉय यांच्यासारखे 'थोर विचारवंत' भारतीय संविधान बदलवून टाकण्याची भाषा करीत आहेत. त्याच वेळेला महाराष्ट्राच्या उच्च शिक्षण विभागातील काही अधिकारी, उच्च शिक्षण सचिव व उच्च शिक्षण संचालक व अनेक ठिकाणचे सहसंचालक अशा अनेक 'घोर अविचारवंतां'ची एक टोळधाड कोणताही संविधान बदल न करता संविधानातील तरतुदी बदलवून वापरताहेत व भारतीय संविधानाला सुरुंग लावण्याचा अनिर्बंध प्रयत्न करीत आहेत व त्यासाठी त्यांनी मा.उच्च न्यायालयाच्या व मा.सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयांची अवहेलना करण्याचा अघोरी मार्ग निवडला आहे. या अघोरी मार्गाच्या वापरामुळे महाराष्ट्राच्या उच्च शिक्षण क्षेत्रात एक फार मोठी अराजकाची स्थिती निर्माण झाली आहे. या अघोरी मार्गाचा वापर करण्यात आल्याची अनेक कुप्रसिद्ध प्रकरणे प्रख्यात झालेली आहेत. त्यातील नमुन्या दाखल काही प्रकरणे पुढीलप्रमाणे सांगता येतील. :-

**३.** मा.उच्च न्यायालयाने २७१९/२०२० **या प्रकरणात दिनांक ९ फेब्रुवारी २०२१** रोजी दिलेल्या एका निर्णयाला एका **सहसंचालकांनी दिनांक १२ मे २०२१ रोजी एक आदेश काढून स्थगिती** (*188/21*) देण्याचा अभूतपूर्व अपप्रकार महाराष्ट्राने पाहिला. सारांश काय तर संविधानात कोणताही बदल न करता जळगावच्या सहसंचालकांनी मा.सर्वोच्च न्यायालयाचे अधिकार वापरले. महाराष्ट्र प्राध्यापक महासंघाने औरंगाबाद येथे पत्रकार परिषद घेऊन त्या सहसंचालकाच्या हकालपट्टीची मागणी केली. हकालपट्टी झाली व अवमान याचिकेनंतर मूळ निर्णयाची अंमलबजावणी झाली. उच्च शिक्षण संचालकांच्या मार्गदर्शनाखाली सहसंचालकांनी हे जे घटनाबाह्य कृत्य केलेले आहे त्यावर कोणतीही कारवाई करायला कोणीही तयार नाही. त्याची साधी चौकशी सुद्धा करण्यात आलेली नाही.

**४.** मा.सर्वोच्च न्यायालयाने दिनांक **३ मार्च २०२२ रोजी घटनेतील कलम २५४ चा अर्थ निश्चित करून दिला.** त्याप्रमाणे विद्यापीठ अनुदान आयोगाच्या रेग्युलेशनचे श्रेष्ठत्व महाराष्ट्राच्या मा.राज्यपालांनी व मंत्रीमंडळाने मान्य केले असतांना तसे करण्यास आढ्यताखोरपणे उच्च शिक्षण विभागातील अधिकारी नकार देतात हा शिरजोरपणाचा प्रकार आहे. मा.सर्वोच्च न्यायालयाने निश्चित करून दिलेल्या कायद्याच्या अंतिम अर्थाचे पालन न करणे हे असंवैधानिक व घटनाबाह्य कृत्य होय. असत्य माहिती दाखल करून १३२० कोटी रुपये केंद्राकडून मिळवून भारताच्या मा.राष्ट्रपतींची, केंद्रीय मंत्रीमंडळाची व राज्य मंत्रीमंडळाची या अधिकाऱ्यांनी उघडउघड फसवणूक करणे हे अत्यंत लज्जास्पद कृत्य होय. घटनेतील कलम २५४ मध्ये घटनादुरुस्ती करून बदल करणे ही वेगळी गोष्ट आहे पण ते कलम आज जसेच्या तसे आहे. त्यामध्ये बदल करण्यात आलेला नाही. मात्र उच्च शिक्षण सचिव व उच्च शिक्षण संचालक, सर्व सहसंचालक व उच्च शिक्षण विभागातील अधिकाऱ्यांची 'टोळी' या कलमाचा दररोज भंग करीत आहे. मा.सर्वोच्च न्यायालयाचा निर्णय झाल्यानंतरही **२०२२, २०२३ व आता २०२४ मध्ये अखंडपणे त्यांनी हे कार्य सुरू ठेवलेले आहे. त्यांच्यावर कारवाई करायला कोणीही तयार नाही.** भारतीय संविधान आपण अशा रीतीने बदलून वापरले तरी आपल्यावर कोणतीही कारवाई होऊ शकत नाही याची खात्री त्यांना कुठून आली?

**५.** "**जुलै २००९ पूर्वी ज्यांनी एम.फील. पदवी धारण केली आहे, अशा शिक्षकाला नेमणुकीच्या पहिल्या दिवसापासून सेवा धरून आश्वासित प्रगती योजनेसह इतर सर्व लाभ द्यावे लागतील**" सन २०१० मधील पहिल्या व दुसऱ्या मा.उच्च न्यायालयाच्या निर्णयांनी हा कायद्याचा अंतिम अर्थ निश्चित करून दिला. त्यावर मा.सर्वोच्च न्यायालयाचे शिक्कामोर्तब झाले. त्याला धरून दिनांक २४ फेब्रुवारी २०१७ रोजी मा.नागपूर खंडपीठाने तत्सम निर्णय दिला. त्यापूर्वी अनेक खंडपीठांनी तसेच निर्णय दिलेले असल्यामुळे सरकारी वकिल निर्णयाशी सहमत झाले. तरीही उच्च शिक्षण विभागाच्या अधिकाऱ्यांनी विशेष अनुमती याचिका (SLP) दाखल करण्याच्या सूचना दिल्या. सर्वोच्च न्यायालयातील दिल्लीस्थित सरकारी वकिलांनी हे प्रकरण विशेष अनुमती याचिका (SLP) दाखल करण्याच्या लायकीचे नाही तेव्हा विशेष अनुमती याचिका (SLP) दाखल करण्याच्या सूचना मागे घ्याव्यात अशी विभागाला विनंती केली पण उच्च शिक्षण विभागाच्या अधिकाऱ्यांनी आपला राजहट्ट कायम ठेवला. गेली १३-१४ वर्षे मा.सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयाविरुद्ध कृती करण्याचे हे घटनाबाह्य अपकृत्य उच्च शिक्षण विभागातील अधिकाऱ्यांच्या या टोळीने अखंडीतपणे सुरू ठेवले आहे. आपल्यावर कोणीही कोणतीही कारवाई करू शकत नाही याबाबत या टोळीला खात्री आहे असे दिसून येते.

**६.** विशेष अनुमती याचिका (SLP) दाखल झाली व फेटाळल्या गेली. सर्वोच्च न्यायालयाने अशी आगंतुक (uncalled for) प्रकरणे इथे आणत जाऊ नका असे ताशेरे ओढले. राज्यशासनाकडून आगंतुक प्रकरणे दाखल होण्याची संख्या फार वाढली आहे. राज्याच्या मुख्य सचिवांनी याबाबत कारवाई करावी, असे मा.सर्वोच्च न्यायालयाने या प्रकरणी आदेश दिले. राज्याच्या मुख्य सचिवांनी तसे परिपत्रक काढले पण उच्च शिक्षण विभागातील अधिकारी दुरुस्त व्हायला तयार नाहीत. मा.उच्च व सर्वोच्च न्यायालयाने धोरणात्मक आदेश दिल्यानंतर २०२३ पर्यंत त्याबाबतचा धोरणात्मक निर्णय अजूनही निर्गमित होऊ नये ही अत्यंत लाजीरवाणी गोष्ट तर आहेच पण भारतीय संविधानातील तरतुदींचा भग करणारी आहे.

**७.** "**जुलै २००९ पूर्वी ज्यांनी एम.फील. पदवी धारण केली आहे, अशा शिक्षकाला नेमणुकीच्या पहिल्या दिवसापासून सेवा धरून आश्वासित प्रगती योजनेसह इतर सर्व लाभ द्यावे लागतील**" असा मा.उच्च न्यायालयाचा आदेश आहे. मा.सर्वोच्च न्यायालयाने या निर्णयावर शिक्कामोर्तब केले आहे असे असतांना महाराष्ट्र प्राध्यापक महासंघाच्या प्रतिनिधी मंडळाशी दिनांक २० ऑक्टोबर २०२३ रोजी उच्च शिक्षण संचालकांनी चर्चा केली. सारा विषय समजून घेतला व दिनांक २३ नोव्हेंबर २०२३ रोजी "(२) **ज्यांनी सेवेत असताना एम.फील. अर्हता धारण केली असेल, त्यांना सदर अर्हता धारण केल्याच्या दिनांकापासून कॅस अंतर्गत पदोन्नतीचे लाभ देय राहतील.**" असे आदेश काढले. उच्च शिक्षण संचालकांची ही घोडचूक दुरुस्त करण्यासाठी मंत्रालयातील उपसचिव दर्जाच्या अधिकाऱ्याने दिनांक ३० नोव्हेंबर २०२३ रोजी एक वेगळा आदेश काढला त्यात "(ब) **अध्यापकांनी सेवेत असताना एम.फील. अर्हता धारण केली असेल तर, विद्यापीठ अनुदान आयोगाने दिलेली मान्यता विचारात घेऊन, विद्यापीठाने संबंधित उमेदवाराला ज्या दिनांकापासून परीक्षा उत्तीर्ण होण्यापासून सूट दिली असेल अशा दिनांकापासून त्याला कॅस अंतर्गत पदोन्नतीचे लाभ अनुज्ञेय होतील.**" असे नमूद करून आणखी महाघोडचूक करून ठेवली.

**८.** उच्च शिक्षण संचालकांचे आदेश वेगळे, उपसचिवांचे आदेश त्याहून वेगळे आणि दोघांनीही मा.उच्च न्यायालयाचा व मा.सर्वोच्च न्यायालयाचा निर्णय वाचलाच नाही. वाचला असल्यास त्यांना तो समजलाच नाही. साधारणपणे

लिहिता वाचता येणाऱ्या व्यक्तिनांच उच्च शिक्षण संचालक व उपसचिव, उच्च शिक्षण या पदांवर नेमले जाते ना? मग एवढ्या मोठ्या पदावर काम करणाऱ्या या अधिकाऱ्यांना न्यायालयाच्या निर्णयातील दोन ओळी वाचता येत नसतील तर त्यांचा उपयोग काय? खरी गोष्ट अशी आहे की, त्यांना त्या ओळी वाचता आल्या आहेत व समजल्याही आहेत. पण भारतीय संविधानातील तरतुदींमध्ये प्रत्यक्ष बदल करण्याची काय आवश्यकता आहे? त्या तरतुदींचा मा.सर्वोच्च न्यायालयाने निश्चित करून दिलेला अर्थ बाजूला ठेऊन आपण आपल्या मनाप्रमाणे अर्थ लावून अंमलबजावणी करण्याचा 'उद्योग' असाच चालू ठेवला तरी आपल्यावर कोणीही कोणतीही कारवाई करू शकत नाही, करणार नाही याची खात्री असल्याशिवाय हा 'कुटीरोद्योग' एवढा भरभराटीला येऊ शकत नाही.

**९.** ७१ दिवसांच्या बेकायदेशीर वेतन कपातीच्या प्रकरणी मा.सर्वोच्च न्यायालयाने कन्फर्म केलेल्या मा.उच्च न्यायालयाच्या निर्णयात **"(i) या सर्व शिक्षकांचे बेकायदेशीररीत्या कापलेले ७१ दिवसांचे वेतन त्यांना परत करा (ii) ते विलंबाने परत केल्याबद्दल देय दिनांकापासून अदायगीच्या दिनांकापर्यंत त्यावर आठ टक्के व्याज अदा करा"** असे आदेशित केले. न्यायालयाच्या आदेशाप्रमाणे या दोनही रकमा त्यांना परत करा असा शासननिर्णय दिनांक ७ डिसेंबर २०२० रोजी निघाला. तर मा.सर्वोच्च न्यायालयाचे पूर्नविलोकनाचे अधिकार वापरून उच्च न्यायालयाचा निर्णय व राज्यशासनाचा शासननिर्णय आपल्या अधिकारात उच्च शिक्षण संचालकांनी दुरुस्त केला. दिनांक ९ डिसेंबर २०२० रोजी "विलंबाबद्दल ८ टक्के रक्कम देण्याची बाब पूर्णपणे वगळून, फक्त ७१ दिवसांचे कापलेले वेतन परत करा" असे आदेश उच्च शिक्षण संचालकांनी आपल्या सहसंचालकांना दिले. **मा.उच्च न्यायालयाच्या निर्णयात व शासननिर्णयात दुरुस्ती करण्याचा आपल्याला अधिकार नाही एवढीही अक्कल संचालक पदावर काम करणाऱ्या व्यक्तीला नसेल तर त्यांना ते पद भूषविण्याचा अधिकार कसा काय प्राप्त होतो?** देय दिनांकापासून अदायगीच्या दिनांकापर्यंत मा.उच्च न्यायालयाच्या निर्णयाप्रमाणे आठ टक्क्याची रक्कम उच्च शिक्षण संचालकांकडून आजही अदा करण्यात आलेली नाही. भारतीय संविधानात दुरुस्ती करून "मा.उच्च न्यायालयाच्या निर्णयातील एखादा भाग वगळण्याचा फक्त सर्वोच्च न्यायालयाला असलेला अधिकार यापुढे उच्च शिक्षण संचालकांना प्रदान करण्यात येत आहे." अशी तरतूद जोपर्यंत करण्यात येत नाही तोपर्यंत उच्च शिक्षण संचालकांनी हा 'धंदा' सुरू ठेवणे हे धडधडीत संविधान विरोधी कृत्य होय.

**१०.** अवमान याचिकेची नोटीस मिळाल्यावर दिनांक १२ ऑगस्ट २०२२ रोजी उच्च शिक्षण संचालकांनी जो आदेश काढला त्यामध्ये त्यांनी अध्यापकनिहाय **देय दिनांकापासून प्रत्यक्ष वेतन अदायगी झालेल्या दिनांकापर्यंत 8% p.a. व्याजाच्या रकमेची मागणी आजच संचालनालयाला सादर करा** असे आपल्या आदेशात नमूद केले. पण या रकमा या शिक्षकांना पूर्णांशाने अदा करावयाच्या नाहीत. त्यात फार मोठ्या प्रमाणात कपात करावयाची असे त्यांनी मनाशी ठरवून टाकले होते. त्यासाठी अत्यंत अभद्र मार्गाचा त्यांनी वापर केला. **आपल्या आदेशात मा.उच्च न्यायालयाचा निर्णय उद्धृत करतांना त्यांनी त्यातील एक शब्द गाळून टाकला. त्यामुळे मनमानी कपात करण्याचे समाधान त्यांनी मिळविले. उच्च शिक्षण संचालक या नात्याने आपल्या आदेशात मा.उच्च न्यायालयाचा निर्णय उद्धृत करतांना न्यायालयाच्या निर्णयातील शब्द वगळून टाकण्याचे कृत्य हे गुन्हेगारी स्वरूपाचे कृत्य आहे ही गोष्ट त्यांच्या लक्षात आली नाही.** मा.उच्च न्यायालयाच्या निर्णयाची अंमलबजावणी करण्यासाठी संचालकांनी काढलेल्या आदेशात मा.उच्च न्यायालयाचा निर्णय उधृत करतांना अनधिकाराने त्यातील शब्द गाळून टाकण्याच्या आपल्या असंवैधानिक कृत्याबद्दल आपल्यावर कोणतीही कारवाई होणार नाही याची त्यांना खात्री होती. त्यांची खात्री त्यांच्याजवळ. आज उच्च शिक्षण क्षेत्रासमोर महत्त्वाचा प्रश्न उभा आहे तो असा की, भारतीय संविधानातील आजच्या तरतुदीप्रमाणे मा.उच्च न्यायालयाच्या निर्णयातील एखादा शब्द गाळण्याचा अधिकार हा फक्त मा.सर्वोच्च न्यायालयाला आहे. "आता यापुढे असा अधिकार महाराष्ट्राच्या राज्याच्या उच्च शिक्षण संचालकांना देण्यात येत आहे" अशी घटनादुरुस्ती होत नाही तोपर्यंत त्यांनी असा अधिकार वापरणे हा निव्वळ पोरकटपणा होय.

**११.** मारुती दत्तात्रय पाटील प्रकरणात शासनाने दाखल केलेली विशेष अनुमती याचिका (SLP) दिनांक १ जुलै २०१९ रोजी मा.सर्वोच्च न्यायालयात 'डिसमिस' झाली. त्यानंतर विजयकुमार रणपीसे प्रकरणात SLP दाखल करतांना "यापूर्वी तत्सम प्रकरण या न्यायालयात निकाली निघाले आहे काय?" या रकान्यापुढे "No similar matter is disposed of" अशी धडधडीत खोटी माहिती उच्च शिक्षण विभागाच्या अधिकाऱ्यांनी शपथपत्रावर मा.सर्वोच्च न्यायालयात दाखल केली. एवढ्यावर हा खोटेपणा थांबला नाही तर "तत्सम प्रकरण या न्यायालयात प्रलंबित आहे काय?" हा रकाना भरतांना अमरावतीचे श्री.राजेश वसंतराव पांडे यांचे प्रकरण आपल्याच अधिकाऱ्यांच्या गैरवर्तनामुळे येथे 'पेंडींग' पडलेले आहे याची माहिती असतांना **"No similar matter is pending" अशी धडधडीत खोटी माहिती शपथपत्रासह सर्वोच्च न्यायालयात दाखल केली. असा खोटारडेपणा एकापेक्षा जास्त प्रकरणात या अधिकाऱ्यांनी केल्याचे पुरावे उपलब्ध आहेत. खोटेपणा उघडा पडल्याने त्या सर्व प्रकरणी 'डिसमिस' त्यांच्या नशिबी आले.**

**१२. तत्सम विषयावरील तीन विशेष अनुमती याचिका मा.सर्वोच्च न्यायालयाने फेटाळल्या असतांना ही बाब सर्वोच्च न्यायालयात 'पेंडींग' आहे अशी सरळ सरळ असत्य माहिती मा.उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठासमोर W.P.No. 4289 of 2019 च्या सुनावणीच्या वेळी सहसंचालकांनी ठेवणे, त्या आधारावर तेथे प्रकरण 'पेंडींग' पाडण्यात तात्पुरते यश मिळविणे, हा अव्वल दर्जाचा लुच्चेपणा तर आहेच पण मिळालेल्या या तात्पुरत्या यशाचा झेंडा हाती घेऊन इतर खंडपीठासमोर प्रकरण तात्पुरते 'पेंडींग' पाडण्यात यश मिळविणे, हा उच्च शिक्षण विभागाचे नेतृत्त्व करणाऱ्या या अधिकाऱ्यांच्या लुच्चेपणाचा कडेलोट म्हणून सांगता येईल. अर्थात हे यश तात्पुरतेच होते.**

# IN THE SUPREME COURT OF INDIA

CIVIL APPELLATE JURISDICTION : **CIVIL APPEAL NO. 1123 OF 2015**

(Arising out of SLP(C) NO.321 OF 2015)

(Para 1 to 19 are not printed here)

**20.** We may hasten to add that though the said decision has been explained and diluted on certain other aspects, **but the paragraphs which we have reproduced as a concept holds the filed as it is a fundamental concept in service jurisprudence.** It will be appropriate and apposite on the part of the employers to remember the same and ingeminate it time and again so that unnecessary litigation do not travel to the Court and the employers show a definite and correct attitude towards employees. We are compelled to say so as we find that the intention of the State Government from paragraph 5 of the circular/ memorandum has been litigated at various stages to deny the benefits to the respondents. **It is the duty of the State Government to avoid unwarranted litigations and not to encourage any litigation for the sake of litigation. The respondents were entitled to get the benefit of pension and the High Court has placed reliance on the decision of another High Court which has already been approved by this Court.** True it is, there is slight difference in the use of language in the Haryana Pension Rules 2009 and the circular/memorandum issued by the State of Rajasthan, but a critical analysis would show that the final consequence is not affected.

**21.** It is urged before us that it will put a heavy financial burden on the State. The said submission has been seriously resisted by the learned counsel for the respondents by urging that hardly 200-250 retired lecturers in the selection scale are alive in praesenti and the State cannot take a plea of financial burden to deny the legitimate dues of the respondents.

**22.** In view of the aforesaid analysis, we do not perceive any merit in this batch of appeals and accordingly, the same stands dismissed. The benefit shall be extended to the respondents within a span of three months from today failing which the accrued sum shall carry interest @ 9% per annum till realisation. There shall be no order as to costs.

**DIPAK MISRA J  ABHAY MANOHAR SAPRE J**
**NEW DELHI : JULY 1, 2015.**

(153/2015)

**१३.** शासनाने संघटनेशी चर्चा करून मार्ग काढण्याची लक्षात घेण्यासारखी गौरवशाली परंपरा महाराष्ट्राला लाभलेली आहे. देशात आणीबाणी लागू झालेली आहे याचा फायदा घेऊन उच्च शिक्षण विभागातील अधिकाऱ्यांनी शासनाच्या घोषित धोरणाविरुद्ध दिनांक ४ ऑक्टोबर १९७५ रोजी एक '**विक्षिप्तपणाचा शासननिर्णय**' निर्गमित केला. महाराष्ट्र प्राध्यापक महासंघाने त्या शासननिर्णयाला न्यायालयात व न्यायालयाच्या बाहेर तीव्र विरोध केला. महाराष्ट्र प्राध्यापक महासंघाच्या अध्यक्ष व सचिवांना 'मिसा' अंतर्गत अटक करून पंधरा महिने स्थानबद्धतेत ठेवण्यात आले. पण महाराष्ट्र प्राध्यापक महासंघाने याबाबतीत संघर्ष सुरूच ठेवला. हा संघर्ष जवळ जवळ दोन वर्षे सुरू होता. त्यानंतर राज्याचे मा.मुख्यमंत्री श्री.वसंतदादा पाटील यांना याबाबतीत तपशीलवार निवेदन देण्यात आले. मा.मुख्यमंत्र्यांनी ताबडतोबच दिनांक २३ एप्रिल १९७७ रोजी महाराष्ट्र प्राध्यापक महासंघाशी चर्चा आयोजित केली. स्वतः मा.मुख्यमंत्री, अर्थमंत्री, शिक्षणमंत्री व संबंधित विभागाचे सचिव या चर्चेला हजर होते. मा.मुख्यमंत्र्यांनी महासंघाशी चर्चा करून निरनिराळ्या मुद्यांबाबतची '**विपरित करणी**' समजून घेतली व निरनिराळ्या चार मुद्यांबाबतचे महाराष्ट्र शासन व महाराष्ट्र प्राध्यापक महासंघ यांच्यामध्ये झालेले मतैक्य त्याच दिवशी नोंदबद्ध करून (Consensus No. 1 : 23.04.1977) महासंघाला देण्यात आले. त्यानंतर पुन्हा दुसरी बैठक मा.मुख्यमंत्र्यांनी दिनांक ४ जून १९७७ रोजी आयोजित केली. चर्चा अपुरी राहिल्यामुळे बैठक दिनांक ८ जुलै १९७७ रोजी पुन्हा सुरू राहिली. या बैठकीला सर्व विद्यापीठांचे कुलगुरूसुद्धा उपस्थित होते. वेगवेगळ्या दोन मुद्यांवर उभयपक्षी झालेले मतैक्यपत्र (Consensus No. 2 : 15.07.1977) नोंदविण्यात आले व त्याची प्रत महाराष्ट्र प्राध्यापक महासंघाला देण्यात आली. कार्यभाराविषयीच्या एका मुद्यावर दिनांक २२ ऑगस्ट १९७७ रोजी पुन्हा मुख्यमंत्र्यांनी बैठक बोलाविली व त्या एकाच मुद्यावर तपशीलवार चर्चा करून उभयपक्षी झालेले मतैक्यपत्र (Consensus No. 3 : 22.08.1977) नोंदबद्ध करण्यात आले. या तीनही मतैक्यपत्राच्या आधारावर मा.मुख्यमंत्र्यांच्या निदेशानुसार Terms of Settlement चा दस्तऐवज तयार करण्यात आला व तो दिनांक २२ सप्टेंबर १९७७ रोजी मा.उच्च न्यायालयासमोर दाखल करण्यात आला. "**विक्षिप्तपणाचा शासननिर्णय**" (०४.१०.१९७५) मागे घेण्यात आला व तीनही मतैक्यपत्रावर आधारित **सुधारित शासननिर्णय** दिनांक २५ ऑक्टोबर १९७७ रोजी निर्गमित करण्यात आला.

**१४.** कार्यभाराविषयीचा मुद्दा मा.मुख्यमंत्र्यांच्या व मा.उच्च न्यायालयाच्या स्तरावर संपूर्णपणे निकाली निघालेला असतांना उच्च शिक्षण विभागातील अधिकाऱ्यांनी १९८७-८८ मध्ये पुन्हा हा मुद्दा उकरून काढला. महाराष्ट्र प्राध्यापक महासंघाने शिक्षण सचिवांच्या त्या प्रस्तावाला तीव्र विरोध केला. महाराष्ट्राच्या मा.मुख्यमंत्र्यांना त्याबाबतचे एक तपशीलवार निवेदन देण्यात आले. तत्कालीन मा.मुख्यमंत्री श्री.शरदराव पवार यांनी महाराष्ट्र प्राध्यापक महासंघाच्या कार्यकारी मंडळाला चर्चेसाठी बोलाविले. दिनांक ११, १३, १४, १७ व १८ जानेवारी १९८९ अशी सतत पाच दिवस ही चर्चा झाली. मा.मुख्यमंत्र्यांनी महासंघाचे म्हणणे ऐकून घेतले व महाराष्ट्र प्राध्यापक महासंघ व महाराष्ट्र शासन यांच्यामध्ये झालेले सहमतीपत्र (Agreement) निरनिराळ्या दहा परिच्छेदांमध्ये शब्दबद्ध करण्यात आले व दिनांक १८ जानेवारी १९८९ रोजी ते उभयपक्षी स्वाक्षरीत होऊन महासंघाला त्याची प्रत देण्यात आली व कार्यभाराविषयीचा प्रश्न कायमचा निकाली निघाला.

**१५.** मा.श्री.विनोद तावडे हे महाराष्ट्र राज्याचे उच्च शिक्षणमंत्री असतांना सन २०१८ मध्ये असाच एक प्रकार घडला. निरनिराळ्या चार-पाच मुद्यांवर उच्च शिक्षण विभागातील अधिकाऱ्यांनी अत्यंत चुकीची भुमिका घेऊन त्याची अंमलबजावणी सुरू केली. महाराष्ट्र प्राध्यापक महासंघाने त्या विरोधात आंदोलन सुरू केले. राज्याचे उच्च शिक्षणमंत्री मा.श्री.विनोद तावडे यांनी महाराष्ट्र प्राध्यापक महासंघाला चर्चेसाठी बोलाविले व या चर्चेमध्ये सर्व विषय तपशीलाने समजावून घेतले व त्या सर्व विषयांच्या बाबतचे चुकीचे निर्णय दुरुस्त करण्याचे मान्य केले. दिनांक २५ सप्टेंबर २०१८ रोजीच्या या बैठकीचे अधिकाऱ्यांनी तयार केलेले मूळ इतिवृत्त महाराष्ट्र प्राध्यापक महासंघाकडे पाठविण्यात आले. दुर्दैवाने सर्वच बाबतीत अधिकाऱ्यांनी झालेल्या निर्णयांची कार्यवृत्तामध्ये अत्यंत चुकीची नोंद केलेली होती. महाराष्ट्र प्राध्यापक महासंघाच्या कार्यकारी मंडळाने दिनांक ६ ऑक्टोबर २०१८ रोजी झालेल्या बैठकीमध्ये हे इतिवृत्त विचारात घेतले व आंदोलन सुरू ठेवण्याचा निर्णय कायम ठेवला. इतिवृत्तामध्ये निर्णय यथोचितरित्या नोंदविण्यात आलेले नाहीत ही गोष्ट लक्षात आल्यावर मा.उच्च शिक्षणमंत्री श्री.विनोद तावडे यांनी अधिकाऱ्यांना आदेश दिले व चोवीस तासाच्या आत इतिवृत्त दुरुस्त करून सुधारित इतिवृत्त महाराष्ट्र प्राध्यापक महासंघाकडे पाठविले. सुधारित इतिवृत्त ठरल्याप्रमाणे असल्यामुळे महाराष्ट्र प्राध्यापक महासंघाच्या कार्यकारी मंडळाने दिनांक १० ऑक्टोबर २०१८ रोजीच्या बैठकीत आंदोलन मागे घेण्याचा निर्णय घेतला.

**१६.** सन २०२४ मध्ये आता उच्च शिक्षण विभाग कुठे आहे? भारतीय घटनेमध्ये बदल न करता घरगुती पद्धतीने घटनेतील तरतुदीमध्ये बदल करून त्यांचा वापर करण्याचा हा जो 'कुटीरोद्योग' उच्च शिक्षण विभागात सुरू आहे त्याची मोजकी उदाहरणे वर नमूद केलेली आहेत. **दिनांक २१ जानेवारी २०२४ रोजी ११८ परिच्छेदांचा एक तपशीलवार ठराव महाराष्ट्र प्राध्यापक महासंघाच्या कार्यकारी मंडळाने मंजूर केला** असून त्यामध्ये अशी अनेक उदाहरणे नमूद आहेत. तो ठराव लगेचच राज्याच्या मा.उच्च शिक्षणमंत्र्यांना सादर करण्यात आलेला आहे. पण त्यावर त्यांनी कोणतीही कारवाई केल्याचे आढळून येत नाही.

**१७.** घटनेने ज्या गोष्टी बंधनकारक केलेल्या आहेत त्यांची अंमलबजावणी त्या पद्धतीने न होणे हे घटनाबाह्य कृत्य होय. अशा परिस्थितीत घटनाबाह्य कृत्य करणाऱ्या अधिकाऱ्यांना चाप लावणे, त्यांच्यावर कारवाई करणे, त्यांचा बंदोबस्त करणे ही त्या विभागाचे नेतृत्त्व करणाऱ्या मंत्र्यांची जबाबदारी असते. तेसुद्धा घटनेप्रमाणेच. प्रत्येक मंत्र्यांनी आपले पद धारण करण्यापूर्वी घटनेचे पालन करण्याबाबतची शपथ घेतली पाहिजे असे बंधन भारतीय संविधानाने घालून दिलेले आहे. ही शपथ कोणत्या शब्दात घेतली पाहिजे हेही संविधानानेच निश्चित करून दिलेले आहे. भारतीय संविधानाच्या तिसऱ्या परिशिष्टामध्ये राज्याच्या मंत्रीमंडळामध्ये मंत्री म्हणून समाविष्ट होत असतांना घ्यावयाच्या शपथेची शब्दरचना पाचव्या क्रमांकावर समाविष्ट आहे. त्या शपथेमधील "**भारतीय संविधानाबद्दल मी खरी श्रद्धा व निष्ठा बाळगीन**" ही शब्दरचना तर महत्त्वाची आहेच पण त्याच बरोबर "राज्याचा मंत्री म्हणून माझी कामे निष्ठापूर्वक व शुद्धबुद्धीने पार पाडीन आणि **संविधान व कायदा यानुसार सर्व तऱ्हेच्या लोकांना मी निर्भयपणे व निःस्पृहपणे, तसेच कोणाच्याही विषयी ममत्वभाव किंवा आकस न बाळगता न्याय्य वागणूक देईन.**" हीही शब्दरचना महत्त्वाची आहे. उपरोक्त प्रमाणे शपथ घेऊनच मा.चंद्रकांतदादा पाटील हे उच्च शिक्षणमंत्री पदावर आरुढ झालेले आहेत. "आपल्या विभागातील अधिकाऱ्यांनी हा जो घटनाबाह्य धुडगूस घातला आहे तो आपण आठ दिवसात दुरुस्त करू" अशी कृती त्यांनी करणे एवढेच कायदेशीर कृत्य ते करू शकतात. याशिवाय कोणतीही कृती किंवा अकृती ही घटनाबाह्य व बेकायदेशीरपणाची असेल हे त्यांनी लक्षात घेणे आवश्यक आहे.

**१३ एप्रिल २०२४**

**- प्रा.बी.टी.देशमुख**
*माजी विधान परिषद सदस्य व*
*महाराष्ट्र प्राध्यापक महासंघाचे माजी अध्यक्ष*

## NET/ SET MATTER IN THE SUPREME COURT : on 1st May 2024

Matter on NET/ SET came up today for hearing. Govt.advocate requested to adjourn the matter but it is rejected. Court wanted to check whether notices to all interveners have gone? This will be checked today and tomorrow. 2nd May hearing will start at 10.30 am or thereafter. Again today at 3.50 pm attempt was made by Govt advocate to mention for taking up matter in July after vacation. This was rejected by the judges.

**On 2nd May 2024 :** The matter was in the supreme court on board at serial number 106. It did not reach till 4 o'clock, when the court rose for the day. The government advocate requested that the matter be kept immediately after vacation in July 2024. The matter will now appear on board in July 2024 for final hearing

**Dr.S.P. Lawande** *President* **Dr.P.B.Raghuwanshi,** *Secretary*

**MAHARASHTRA FEDERATION OF UNIVERSITY & COLLEGE TEACHERS ORGANIZATION (MFUCTO)**

# ‘सुटा’च्या पदाधिकाऱ्यांना याचिकेबाबत (W.P. No. 1597/2010) विनंती

- **प्रा.बी.टी.देशमुख,** *माजी विधान परिषद सदस्य व महाराष्ट्र प्राध्यापक महासंघाचे माजी अध्यक्ष*

**१.** सन २००६ पूर्वी सेवानिवृत्त झालेल्या प्राध्यापकांचे सेवानिवृत्ती वेतन ठरवितांना भेदभावपूर्ण वागणूक देण्याविरुद्ध ‘सुटा’च्या वतीने ज्येष्ठ नेते प्रा.श्री.संभाजीराव जाधव यांनी मा.उच्च न्यायालयाच्या मुंबई खंडपीठासमोर दिनांक २२ फेब्रुवारी, २०१० रोजी याचिका सादर केली. ही सन २०१० ची याचिका क्रमांक १५९७ होय. निरनिराळ्या ३५ परिच्छेदांमधून मूळ याचिकेमध्ये प्रतिपादन करण्यात आले असून निरनिराळी १२ सहपत्रे सोबत जोडलेली आहेत. शेवटच्या परिच्छेदामध्ये मुख्य विनंती (Prayer) पुढीलप्रमाणे होती :- “(a) by a Writ of Mandamus or any other Writ in the like nature, the Respondent No.1 be directed to give to the Petitioners and pre-2006 Pensioners the same Benefits as given to the Pensioners by the Government of India Order dated 01.09.2008, annexed at Exhibit “B” hereto;” निरनिराळ्या राज्यशासनांनी केंद्राच्या योजनेप्रमाणेच सेवानिवृत्तांसाठी काढलेले शासननिर्णय या याचिकेसोबत सहपत्र म्हणून जोडलेले आहेत. राजस्थान, पश्चिम बंगाल, गुजरात, तामिलनाडू इत्यादी राज्यशासनाच्या शासननिर्णयांचा त्यामध्ये समावेश आहे. याचिकाकर्त्यांची एकूण संख्या ११४ आहे. प्रत्यक्षात क्रमांक १ वर ‘सुटा’ संघटना म्हणून व इतर ११३ शिक्षक याचिकाकर्ते म्हणून या याचिकेमध्ये समाविष्ट आहेत. हे सर्व शिक्षक महाराष्ट्रातील प्राध्यापक संघटनेच्या पहिल्या पिढीतील लढावू सदस्य आहेत.

**२.** निरनिराळ्या विद्यापीठ स्तरावरील संघटनांनी या याचिकेमध्ये संबंधित शिक्षकांना सहभागी करावे काय? याचाही विचार त्यावेळी झाला होता. खुद्द संभाजीरावांचे म्हणणे असे होते की “याचिकेमधील ‘प्रेअर’ ही आपण पिटीशनर्स व २००६ पूर्वीचे असे सर्व शिक्षक यांचे करिता केलेली आहे. दुसरे म्हणजे जवळ जवळ ११३ लोकांच्या सहभागामुळे पुरेसे अर्थबळ ‘सुटा’च्या स्तरावर उभे झाले आहे व तिसरे म्हणजे आता सर्व विद्यापीठांच्या स्तरावरून शिक्षकांचा सहभाग मिळवायचा तर त्यामध्ये बराच वेळ जाईल व याचिका दाखल करण्याच्या कामी अकारण विलंब होईल.” या कारणे सर्व स्तरावरून एकच याचिका दाखल करण्याचा विषय मागे पडला. बहुधा प्रत्येक सुनावणीच्या वेळी संभाजीराव स्वतः न्यायालयात उपस्थित असत. काही प्रसंगी मीही त्यांच्या सोबत उपस्थित होतो.

**३.** इतरही काही याचिका यापूर्वीच दाखल झालेल्या होत्या. सन २००९ ची याचिका क्रमांक १५३० ही यामधील प्रधान याचिका ठरली व ‘सुटा’ची याचिका त्या याचिकेच्या सोबत घ्यावी असे आदेश मा.खंडपीठाने दिनांक १८ मार्च, २०१० रोजी पारित केले. मा.खंडपीठाचा त्याबाबतचा मूळ आदेश शब्दशः पुढीलप्रमाणे :- “P.C. : **(1)** Our attention is invited to order dated 12th January, 2010 passed in Writ Petition No.1530 of 2009. We are also informed that the relief claimed in the said Writ Petition is more or less similar to one involved in the present Petitions. **(2)** In the circumstances, rule. To be heard with Writ Petition No. 1530 of 2009. Counsel appearing for the concerned Respondents waive service. **(3)** Since the leading Petition is filed on the Original Side, Office shall take necessary steps for listing of all these matters before one Bench.” त्यानंतर दिनांक २४ जून, २०११ च्या सुनावणीमध्ये ‘सुटा’च्या याचिकेबाबत मा.खंडपीठाने पुढीलप्रमाणे आदेश पारित केले :- “P.C. : 1. List on 29th June, 2011 along with Original Side Writ Petition No.1530/2009 and Appellate Side Writ Petition Nos.457/2011, 8086/2010, 2804/2011, 9000/2010 and 2871/2003.”

**४.** सन २०११ पर्यंतचा या याचिकेचा प्रवास मी थोडक्यात वर सांगितलेला आहे. संभाजीरावांच्या नंतर या याचिकेच्या प्रवासाशी असलेला माझा संपर्क कमी झाला किंवा जवळ जवळ तुटला असे म्हटले तरी चालेल. ज्या अनेक याचिकेसोबत ‘सुटा’ची ही याचिका (क्रमांक १५९७/२०१०) जोडल्या गेली होती, त्यातील बहुसंख्य याचिका शासकीय कर्मचाऱ्यांच्या व त्यांच्या संघटनांच्या होत्या. पुढे केव्हा तरी त्या याचिका (म्हणजे त्यातील शासकीय कर्मचाऱ्यांच्या याचिका) मा.उच्च न्यायालयाच्या आदेशानुसार MAT कडे हस्तांतरित करण्यात आल्या. शासकीय कर्मचाऱ्यांच्या नसलेल्या उर्वरित याचिका मा.उच्च न्यायालयातच राहील्या. पुढच्या काळात तिकडे ‘मॅट’कडे गेलेल्या याचिकांचे काय झाले व इकडे उच्च न्यायालयापुढे राहिलेल्या याचिकांचे काय झाले? याबाबतची माहिती त्यानंतर उपलब्ध होऊ शकली नाही.

**५.** आता तत्सम विषयावर मा.औरंगाबाद खंडपीठाचा निर्णय *(45/24)* झालेला आहे. त्यानंतर आता नागपूर खंडपीठाचासुद्धा निर्णय *(90/24)* झालेला आहे. संघटनेमध्ये काम करणाऱ्या पहिल्या पिढीतील आपल्या ज्येष्ठ सहकाऱ्यांचा हा विषय आहे हे लक्षात घेता मा.उच्च न्यायालयाच्या दोन खंडपीठांनी दिलेले उपरोक्त न्यायनिर्णय मा.उच्च न्यायालयाच्या मुंबई खंडपीठाच्या लक्षात आणून देण्याची कारवाई ‘सुटा’च्या पदाधिकाऱ्यांनी पार पाडावी अशी त्यांना विनंती आहे.

**६.** उपरोक्त कार्यवाही पार पाडतांना मा.सर्वोच्च न्यायालयाचे दोन निर्णय व मा.उच्च न्यायालयाचा एक निर्णय हा मा.मुंबई खंडपीठाच्या लक्षात आणून देण्यात यावा अशीही विनंती आहे. याचे कारण हे निर्णय याचिका सादर केल्यानंतर झालेले आहेत. ते निर्णय पुढीलप्रमाणे :-

**(A)** मा.सर्वोच्च न्यायालयाने तत्सम विषयावर राजस्थान प्रकरणी १ जुलै २०१५ रोजी दिलेला निर्णय. *(153/2015)* विशेषत त्या निर्णयातील परिच्छेद २० ते २२.

**(B)** मा.गुजरात उच्च न्यायालयाने तत्सम विषयावर दिनांक २० जून २०१७ रोजी दिलेला निर्णय. *(181/2017)* या निर्णयामध्ये मा.उच्च न्यायालयाने पुढीलप्रमाणे आदेश पारित केलेले आहे. :- “We hereby declare that the petitioners pensioners, who have rendered more than 3 years service in selection grade pay scale prior to retirement are entitled to fixation of their pension as per the corresponding pay scale admissible to the selection grade, UGC lecturers i.e. 37400-67000 with grade pay of RS.9000/-.” मा.गुजरात उच्च न्यायालयासमोर बाजू मांडतांना “आम्ही कोणताही भेदभाव केलेला नाही. आम्ही शासकीय कर्मचाऱ्यांना दिलेली निवृत्तिवेतन योजना या शिक्षकांना लागू केलेली आहे” अशी मांडणी गुजरात सरकारने उच्च न्यायालयासमोर केलेली होती. ती मांडणी गुजरात उच्च न्यायालयाने पुढील शब्दात फेटाळून लावली :- “This submission in our view is untenable as it is an unfortunate attempt to equate two unequal groups namely the pensioners not governed by the guidelines and directions of the University Grant Commission and Government of India and the pensioners like the present petitioners, who have been all along given benefits on the basis of the UGCs recommendations in line with Govt. Of India’s instructions and guidelines.” *(See Para 19 of the Gujrat High Court Judgment dated 20th June 2017.)*

**(C)** गुजरात शासनाने मा.उच्च न्यायालयाच्या उपरोक्त निर्णयाच्या विरोधात मा.सर्वोच्च न्यायालयात विशेष अनुमती याचिका दाखल केलेली होती. ती मा.सर्वोच्च न्यायालयाने दिनांक २३.१०.२०१७ रोजी फेटाळून लावली. *(192/2017)*

*****

**NUTA BULLETIN** (Official Journal of NAGPUR UNIVERSITY TEACHERS' ASSOCIATION) **EDITOR :** Prof. Vivek S. Deshmukh, Balaji Society, Yavatmal 445 001. **PUBLISHER :** Dr. Prakash Tayade , 55, “Aai” Dr. Punjabrao Deshmukh Colony, Near V.M.V. Campus, Amravati 444 604 Published at NUTA Bulletin Office, Shikshak Bhavan, Sant Gadge Baba Amravati University Campus, **Amravati- 444 602. PRINTED AT** Bokey Printers, Gandhi Nagar, Amravati. (M.S) **REGD NO**. MAHBIL/2001/4448 Postal Registration No. AMT/RNP/78/2024-26 (Uploaded on www.nuta.in on 08.05.2024) Price : Rs. Five / Name of the Posting office : **R.M.S. Amravati.** Date of Posting **: 15.05.2024**

**If Undelivered , please return to :** NUTA Bulletin Office, Shikshak Bhavan, Sant Gadge Baba Amravati University Campus, **Amravati- 444 602.**

---

To,.......................................................................

.............................................................................

.............................................................................

.............................................................................